RNI No. MAHBIL/2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ७, अंक ५७] मंगळवार, जून १५, २०२१/ज्येष्ठ २५, शके १९४३ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ९४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय
मुंबई ४०० ०३२, दिनांक १४ जून २०२१

**अधिसूचना**

**नोंदणी अधिनियम, १९०८.**

क्रमांक नोंदणी-२०१९/१५६१/प्र.क्र.४१७/म-१(धोरण).—नोंदणी अधिनियम, १९०८ (१९०८ चा १६), अधिनियम, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम ७८ च्या खंड (क) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून,महाराष्ट्र शासन, याद्वारे, संलेखाच्या नोंदणीसाठी, कलम ७८ अन्वये तयार केलेल्या व शासकीय अधिसूचना, महसूल विभाग, क्र. नोंदणी-१५५८/६७७३१-एन, दिनांक १७ जुलै १९६१ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "उक्त अधिसूचना" असा केला आहे) अन्वये प्रसिद्ध केलेल्या शुल्काच्या तक्त्यात पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे आणि उक्त अधिनियमाच्या कलम ७९ द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे ते प्रसिद्ध करीत आहे :—

उक्त अधिसूचनेमध्ये, फी च्या तक्त्यामधील,

(एक) अनुच्छेद एक मध्ये, —

(क) खंड (२) मधील, " गहाणखत (खालील टीप १ व २ पहा)" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ख) खंड (४) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :—

"(५) गहाणखताच्या (खालील टीप १ व २ पहा) व उक्त अधिनियमाच्या कलम ८९ख अन्वये मालकी हक्क विलेख निक्षेपित करून दिलेल्या गहाणखताच्या सूचनेच्या बाबतीत, नोंदणी शुल्क, कमाल पंधरा हजार रुपयांस अधीन राहून, अशा संलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेच्या ०.५ टक्के दराने, आकारण्यात येईल.";

(ग) टीप ६७ नंतर, पुढील टीप जादा दाखल करण्यात येईल :—

" टीप ६८.— जेव्हा उक्त अधिनियमाच्या कलम ८९क मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या न्यायालयाकडून किंवा अधिकाऱ्यांकडून प्राप्त झाली असेल तेव्हा, न्यायालयाच्या हुकूमनाम्यांच्या किंवा आदेशांच्या किंवा उक्त अधिनियमाच्या कलम ८९क मध्ये विनिर्दिष्ट केलेले कोणत्याही प्रकारचे दस्तऐवज किंवा संलेख यांच्या प्रती, दाखल केल्यावर, कोणतेही शुल्क, आकारण्यायोग्य असणार नाही.";

(दोन) अनुच्छेद दहा क (आर्टिकल एक्स ए) वगळण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**श्रीधर डुबे-पाटील,**
शासनाचे सहसचिव.

**REVENUE AND FOREST DEPARTMENT**

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya

Mumbai 400 032, dated the 14th June 2021

*NOTIFICATION*

REGISTRATION ACT, 1908.

No. RGN-2019/1561/C.R.No.417/M-1(Dhoran).– In exercise of the powers conferred by clause (*a*) of section 78 of the Registration Act, 1908 (XVI of 1908), in its application to the State of Maharashtra, and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby, amends the Table of Fees prepared under section 78 and published under the Government Notification, Revenue Department, No. RGN-1558/67731-N, dated the 17th July 1961 (hereinafter referred to as the "said Notification"), for registration of instruments and publishes the same as required by section 79 of the said Act, as follows, namely :–

In the said Notification, in Table of Fees.

(*i*) in Article 1,–

(*a*) in clause (2), the words, brackets and figures "Mortgage (See Notes 1 and 2 below)" shall be deleted ;

(*b*) after clause (4), the following shall be added, namely :–

"(5) The registration fees in case of mortgage (See Notes 1 and 2 below) and notice of intimation of mortgage by depositing title deeds under section 89B of the said Act shall be levied at the rate of 0.5 per cent. of the amount secured by such instrument, subject to maximum of fifteen thousand rupees.";

(*c*) after Note 67, the following note shall be added, namely :–

"Note 68.– No registration fees shall be chargeable on filing of any copies of court decrees or orders or any type of document or instrument specified in section 89A of the said Act when received from the Court or the officers specified in the said section 89A.";

(*ii*) Article XA shall be deleted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SHRIDHAR DUBE-PATIL,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.